

# सर्व भक्तांचे मनपूर्वक स्वागत

नोंदणी क्र : एफ-७३८०/सन १९९९ लातुर





## श्री दत्तसेवा प्रतिष्ठाण

औराद शाहा, ता.निलंगा, जि.लातुर महाराष्ट्र

## शाखा : श्री दत्तसेवा प्रतिष्ठाण, सिध्दबेट, आळंदी (देवाची)



### ॥ श्री ज्ञानदेव तुकाराम ॥



आळंदी हे गाव पुण्यभूमी ठाव । दैवताचे नाव सिद्धेश्वर ॥१॥
चौयांशी सिद्धांचा सिद्धबेटी मेळा । तो सुख सोहळा काय वर्णू ॥२॥
विमानांची दाटी पुष्पांचा वर्षाव । स्वर्गीहुनी देव करीताती ॥३॥
नामा म्हणे देव चला तया ठाया । विश्रांती घ्यावया कल्पवरी ॥४॥

अखिलकोटी ब्रह्मांडनायक षडगुणैश्वर्य संपन्न भगवान श्री पांडुरंग परमात्मा सिध्द तपस्वी महात्यांच्या द्वारा श्री क्षेत्र आळंदी या तिर्थाची सेवनमहात्म वर्णन केले जाते त्यातही विशेष महिमा श्री क्षेत्र सिध्दबेट तपोभूमीचा आहे. श्री संत निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताई यांची जन्मभूमी, कर्मभूमी, लिलाभूमी व वास्तवभूमी या दृष्टीने वारकरी सांप्रदायात चौऱ्यांशी सिध्दांच्या दृष्टीने श्री नाथ संप्रदायात विशेष महत्व आहे.

या श्री संत निळोबारायांच्या उक्तीप्रमाणे जे आळंदी क्षेत्रात यात्रा दर्शन सत्संग वारी या निमिताने अत्यंत बध्देने येतात ते श्री विठ्ठलाला खुप आवडतात. पतिर्वत्रात करी संप्रदाय यांचा प्रचार प्रसार अधिकाधिक व्हावा या सदहेतूने श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी श्री दत्तसंप्रदाय, श्री गुरुचरित्रनाथांचा श्री नवनाथ भक्तीसार आदि ग्रंथांचे अनुष्ठान पुर्वक पारायण चिंतन करण्याची शुध्द भावना असणाऱ्या साधकांसाठी निवास भोजन अनुष्ठानासाठी एक सुसज्ज अशी भव्य वास्तु इंद्रायणी तिरावर माऊलीची तपोभुमी सिध्दबेट या ठिकाणी उभारली आहे. श्री दत्त सेवा प्रतिष्ठाण औराद शहाजानी ता. निलंगा, जि. लातुर या संस्थेव्दारे संस्थेचे अध्यक्ष, सचिव, सदस्य पंचक्रोशी ग्रामस्थ यांच्या अथक प्रयत्नाने भव्य पारायण हॉल बांधुन सुसज्ज आहे. विविध प्रांतातुन देश विदेशातुन आलेल्या भाविकांची निवास भोजन माफक दराने व्यवस्था उत्तमोत्तम करण्याचा संस्थेचा मानस आहे. या कार्यातुन श्री दत्त, श्री नवनाथ उपासक, वारकरी साधक यांची सेवा घडावी. तरी आपल्या जिवनात शांतीसुख समाधान पुर्वक भक्ती नांदण्यासाठी इच्छुक धर्माभिमानी वारकरी साधकांनी व स्त्री पुरुष साधकांनी सदर सुविधेचा आवश्यक लाभ घ्यावा अशी संस्थेच्या वतीने विनम्र प्रार्थना.

आपला नम्र,
अध्यक्ष,-श्री दतसेवा प्रतिष्ठाण
ह.भ.प.श्री.मच्छिंद्र गोरोबा कोळी
कोषाध्यक्ष ह.भ.प.श्री.दत्तात्रय गोरोबा कोळी
सचिव ह.भ.प.श्री.दयानंद गोरोबा कोळी
औराद, ता.निलंगा, जि.लातुर महाराष्ट्र

॥ श्री ॥

--- --- --- ॥ भक्त निवास दिनक्रम ॥ --- --- ---

| | | |
|---|---|---|
| ०१ | पहाटे ४ वाजून ४५ मि. | ब्राम्हमुहूर्तावर पहाटे घंटानाद - |
| ०२ | पहाटे ५ वाजता | उठल्यानंतर नित्यकम स्नानादि करणे माऊली दर्शन नगर प्रदक्षिणा |
| ०३ | सकाळी ७ ते ८ | सिध्दबेट येथे निवासात आपण निवडलेल्या ग्रंथाची, पारायणाची पूर्वतयारी |
| ०४ | सकाळी ८ ते १२ | ग्रंथराज ज्ञानेश्वरी / श्रीगुरूचरित्र / नवनाथ पारायण |
| ०५ | दुपारी १२ वाजून ३० मि. | नैवेद्य, आरती |
| ०६ | दुपारी १२.३० ते १ | भोजनप्रसाद |
| ०७ | दुपारी १ ते ३ | विश्रांती |
| ०८ | दुपारी ३ ते ४ | चिंतन, नामजप |
| ०९ | दुपारी ४ ते ५ | श्री ज्ञानेश्वरी प्रवचन (ज्ञानेश्वरी महाराज मंदीर) उपस्थिती, माऊली दर्शन |
| १० | सायंकाळी ६ ते ७ | भक्तनिवास सायं उपासना हरिपाठ |
| ११ | रात्री ८ ते ९ | भोजनप्रसाद |
| १२ | रात्री ९ ते १० | भजन, चिंतन |
| १३ | रात्री १० वाजता | प्रार्थना, पसायदान व विश्रांती |

# ॥ श्री ज्ञानदेव तुकाराम ॥

## --- --- --- ॥ भक्त निवास नियमावली ॥ --- --- ---

१) भक्त निवासात राहण्यासठी वारकरी नाथसांप्रादायिक अथवा दत्त संप्रदायाची वा अन्य संप्रदायाची उपसना करणाऱ्या साधकांना प्रवेश दिला जाईल.

२) कमीत कमी पाच व अधिकाधिक २१ व्यक्ती राहु शकतील (कौटुंबिक, नातेवाईक, मित्रमंडळी, सत्संग मंडळ, भजनी मंडळ, महिला, पुरूष, बचत गट, धार्मिक शैक्षणिक सेवाभावी संस्थांना प्रमुख्याने प्राध्यान्य)

३) पारायणेच्छु भाविकांनी धार्मिक क्षेत्रातील प्रतीष्ठीत व्यक्ती, मठाधिपती, साधुसंत हरिभक्त पारायण महाराज मंडळी अथवा विविध गावातील मंदिराचे ट्रस्टींचे शिफारस पत्र आणणे आवश्यक आहे त्याच बरोबर स्वतःचे ओळखपत्र व आवश्यक ती कागदपत्रे बरोबर ठेवणे आवश्यक आहे.

४) पारायणाची तारिख किमान ३ महिने आगोदर चौकशी करून निश्चित करावी.

५) आपणांस काही आजार किंवा वैद्यकीय उपचार सुरू असल्यास त्याची सविस्तर माहिती व त्या बाबतचे स्थानिक/गावातील डॉक्टराचे पत्र संस्थाचालक/व्यवस्थापक यांना दाखविणे गरजेचे आहे.

६) सदर कालावधीत जर कदाचित जीवित अथवा वित्तहानी झाल्यास त्यास संस्था जबावदार राहणार नाही सदर व्यक्ती व्यक्तीशः जबाबदार राहील.


७) सदर भक्त निवासात साधकांची भोजनाची व्यवस्था शास्त्रोक्त पद्धतीने गरजेनुसार सर्व सोयी उपलब्ध साधन सामुग्रीद्वारे करण्यास संस्थेचा मानस आहे.
(१ व्यक्तीस/१ दिवस) निवासाची सोय - १००/- रूपये + दोन वेळेस जेवणाचे - २००/- रूपये + अल्पोपहार - ३०/- रूपये + चहा, दुध - २०/- रूपये = ३५०/- रूपये . . . त्याचप्रमाणे ७ दिवसांसाठी ७ × ३५० = २,४५०/- रूपये ११ व्यक्तींसाठी ११ × २,४५० = २६,९५०/- रूपये . . .
२६,९५०/- रूपये + संस्था देणगी स्वरूप - १,१००/- रूपये = **२८,०५०/- रूपये फक्त** . . . (७ दिवसासाठी/११ व्यक्तीसाठी देणगी मुल्य)

८) सत्य संकल्पाचा दाता नारायण या संतवचनानुसार भाविक वारकरी संत सहाले साधकांची सेवा घडण्याचा संकल्प पुर्ण करणारा भगवान श्रीहरी आहे. देव वसे चित्ती त्यांची घडावी संगती | असा आमचा मानस आहे त्यानुसार कार्तिक वद्य ११, कार्तिक वारी, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळा सन २०१३-१४ या एका वर्षाच्या कालावधीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी | गुरूचरित्र | नवनाथ या ग्रंथाची आधिकाधिक पारायणे भाविक साधकांच्या द्वारा संपन्न व्हावीत अशी इच्छा आहे. या बरोबरच संतवाङ्मयाचा प्रचार प्रसार अधिक प्रमाणात व्हावा असा संस्थेचा मानस आहे.

९) उदार भाविक/संस्था दानशूर दाते यांचे साहय्य अपेक्षित आहे. यासाठी आधिकाधिक अर्थिक साहय्य करण्यासाठी संस्था आपणांस आवाहन करीत आहे. आपल्या ऐच्छिक देणगी रोख स्वरूपात अथवा धनादेशाद्वारे प्रतिष्ठानाच्या खात्यावर **श्री दत्तसेवा प्रतिष्ठान, भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा निलंगा लातुर** या नावाने पाठवावा. ईश्वर कृपेने संतमहाराजांच्या आशीर्वादाने हे कार्य तडीस जाईल हा विश्वास आहे . . .

भवदीय,

**श्री दत्त सेवा प्रतिष्ठान**



# श्री दत्तसेवा प्रतिष्ठाण सिद्धबेट आळंदी

## श्री दत्तसेवा स्वःइच्छा अन्नदान मधुकरी समिती

नोंदणी क्र : एफ-७३८०/सन १९९९ लातूर





## आवाहन

### आपण काय करू शकता ?

१. सढळ हाताने देणगी

२. पवित्र कार्यात सहभाग

३. प्रियजनाच्या स्मरणार्थ, शुभप्रसंगी प्रासंगीक देणगी मासिक धर्मभिक्षा योजनेर्त सहभाग

४. धान्य, किराणा, कडधान्य, वस्तु रूपात देणगी धर्मभिक्षा म्हणुन देणगीः स्विकारली जाईल.

५. श्री क्षेत्र आळंदी सिध्दबेट तपोभुमी. श्री निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई जन्मभुमी लिलाभूमी व वास्तवभुमी मध्ये आळंदी पंढरी वारकऱ्यांना अन्नदान करिता देणगी स्विकारली जाईल.


**वार्षिक कुंटूंब नोंदणी चालू आहे. ११००/- रुपये आपल्या जन्मदिनानिमित्त तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी अन्नदान**

नैमेत्तिक अन्नदान : श्री दत्त मंदिर, हनुमान मंदिर औराद (शा), आळंदी, देहू, पंढरपूर, पैठण, गाणगापूर, अक्कलकोट, नृसिंहवाडी

सामाजिक दायीत्वाच्या भुमिकेतुन ईश्वरा अर्पण बुध्दीने केलेल्या आपल्या या सहकार्यातुन श्री ज्ञानेश्वर माऊलीचे आशीर्वाद प्राप्त होऊन आपले कल्याणच होणार आहे.

कृपया या धार्मिक कार्यासाठी धनादेश (चेक) डी. डी. अथवा रोख देणगी श्री दत्तसेवा प्रतिष्ठाण औराद निलंगा जि. लातुर या नावे देणगी स्विकारली जाईल .

प्रतिष्ठाणचे मुख्य उद्देश लक्षात घेऊन वरील सर्व बाबतीत व्यवस्था नियम यात बदल करण्याचा प्रथम अधिकार प्रतिष्ठाण व्यवस्थापनास राहिल .



नोंदणी क्र : एफ-७३८०/सन १९९९ लातुर





# श्री दत्तसेवा प्रतिष्ठाण

औराद शाहा, ता.निलंगा, जि.लातुर महाराष्ट्र

**शाखा : श्री दत्तसेवा प्रतिष्ठाण, सिध्दबेट, आळंदी (देवाची)**

## * वार्षिक उपक्रम *

१) श्री दत्त जयंती उत्सव / दक्षिणमुखी बाल हनुमान जयंती उत्सव औराद (शा)
२) श्री क्षेत्र आळंदी सिद्धबेट - आषाढी वारी प्रस्थान आळंदी ते पंढरपूर पायी वारी पंढरपूर आळंदी पायी वारी (आमरावती दिंडी क्र.१४ रथामागे)
३) संत ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळा (पारायण - अन्नदान)
४) गोकुळअष्टमी (ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सव (पारायण - अन्नदान)
५) तुकाराम बीज / एकनाथ षष्ठी पैठण
६) श्री क्षेत्र गाणगापूर वारी माघ वद्य प्रतिपदा
७) नवरात्री ८) गणेशोत्सव ९) गुरु द्वादशी
१०) पोर्णिमा / लाड कारंजे / नृसिंहवाडी / मोरावळे दत्त मंदिर / शेगाव / श्री क्षेत्र विझंर
११) संत निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई जन्मोत्सव, समाधी उत्सव, गजानन महाराज प्रगट दिन उत्सव
१२) पंढरपूर ते आळंदी पायी वारी नामदेव महाराज कार्तिक वारी
१३) श्रावण मास/अधिक मास सप्ताह अन्नदान
१४) तिर्थयात्रा नियोजन १५) नैमेत्तिक अन्नदान : श्री दत्त मंदिर, हनुमान मंदिर औराद (शा), आळंदी, देहू, पंढरपूर, पैठण, गाणगापूर, अक्कलकोट, नृसिंहवाडी

# ॥ श्री ज्ञानेश्वरी ॥

## ॥ श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र ॥

सर्व जगाला ज्ञानामृत देऊन भक्ती मार्गकडे लावणारे संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज हे जगदोध्दारासाठी शके ११९३ साली पुण्यक्षेत्र अलंकापुरीत (आळंदी) येथे अवतार घेतला जगदोध्दारालागी धरीला अवतार या महान संतपुरूषाचे थोडक्यात चरित्र पाहु.

आपेगांव येथे कुळकर्णीपण ज्या घराण्यात चालत आले (पाहत होते) त्यांचे मूळ पुरूष हरिहर पंत कुळकर्णी होत. ते शके १०६० चे सुमारास कुलकर्णीपण पाहत होते. त्याच वैदिक व वैष्णव कुळात विठ्ठलपंत हे महान थोर भगवत् भक्त होत. हेच ज्ञानेश्वर महाराज यांचे वडील श्री विठ्ठलपंत यांना लहानपणीच घरातून शास्त्राध्ययनाचे धडे मिळाले. वेद व्याकरण शास्त्रध्ययानत अल्पवयातच ते निपूण शास्त्रवक्ते बनले होते. त्या काळच्या पध्दतीनुसार शास्त्रध्ययना बरोबर अनुभवाचा फायदा मिळावा म्हणून देशपर्यटण करणे हे क्रमप्राप्त होते. त्यातच विठ्ठलपंतांना त्यांच्या असणा-या वैराग्याची जोड मिळाली. म्हणून त्यांनी त्यांचे वडील गोविंदपंत माता निराबाई यांना तिर्थयात्रेला जाण्याविषयी विचारणा केली. तेव्हा मातापित्यांनी त्यास अनुमती दिली.

त्यांनी मातापित्यांना वंदन करून तीर्थयात्रेस मुहुर्त केला. श्री विठ्ठलपंत प्रथम श्रीक्षेत्र द्वारका येथे आले. तेथे भगवान कृष्णाचे दर्शन घेतले. ते सुदामपुरी, सोरटी-सोमनाथ, भालुकातीर्थ इत्यादी तीर्थ करीत सप्तश्रुंगी पर्वतावर आले तेथील दर्शन घेऊन ते त्र्यंबकेश्वरी आले. पुढे भिमाशंकर करून श्री क्षेत्र अलंकापुरी येथे आले.

अशा प्रकारे विठ्ठलपंतांनी पवित्र इंद्रायणीचे स्नान करून इंद्रायणीच्या काठावर बसून देवपुजा करीत असता तेथील कुळकर्णी सिध्देश्वर उर्फ सिध्दोपंत यांनी पाहीले. त्यांचे ते शुध्द आचरण पाहुन त्यांना नमस्कार करून तुम्ही कोण? कोठले, वगैरे विचारणा केली. त्यावेळी विठ्ठलपंतानी आपली सर्व हकिगत सांगितली. हे ऐकून आपल्या गावात असा अतिथी आलेला पाहून सिध्दोपंतानी त्यांना आग्रहाने भोजनास आपल्या घरी नेले. भोजन झाल्यावर त्यांच्या घरातील खोलवर चौकशी करून घेतली. आणि आपली उपवर झालेली कन्या रूक्मिणी हिच्यासाठी हा वर योग्य आहे. असा मनात विचार करून त्यांनी विठ्ठलपंतास तिचे पाणीग्रहण करण्यास विनंती केली व तिचा त्यांच्याशी योग्य मुहुर्त पाहून विवाह केला. विवाहानंतर विठ्ठलपंतानी पुढिल तिर्थयात्रे करीता आपल्या सास-या जवळुन अनुमती घेऊन ते एकटेच रामेश्वरास गेले व दक्षिणेकडील तीर्थे करून ते गोकर्ण, कोल्हापूर करून पवित्र कृष्णा व कोयना ह्या नद्यांच्या संगमावर स्नान करण्याकरता क-हाड क्षेत्री गेले. आपल्या यात्रेचा संकल्प पुरा करून आळंदीस परत आले. तिथे आल्यावर आपल्या मातापित्यांना भेटण्याकरिता घरी आपेगांवी जाण्यास निघाले. तेव्हा त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी रूक्मिणीबाई व सासरे सिध्दोपंत हेही जाण्याकरिता निघाले. इकडे विठ्ठलपंताचे वडील गोविंदपंत व मातोश्री निराबाई पुत्राची मार्ग परीक्षा करीत होती अशा स्थितीतच मुलगा सुनेसह घेऊन व्याही मंडळीसह आला हे पाहून त्यांचा आनंद गगनात मावेना. सिध्दोपंतानी वस्त्रालंकार देऊन व्याहांचा बहुमान केला व ते आळंदीला परत आले. त्यानंतर विठ्ठलपंताचे काही दिवस सुखाचे गेले. कालांतराने वृध्द आईवडील वैकुंठवासी झाले. आणि सर्व प्रपंच्याचा भार विठ्ठलपंतावर पडला पण त्याची वृत्ती विरक्त असल्याने ते देवावर भार टाकून नेहमी समाधानी वृत्तीने रहात.

हे वर्तमान सिध्दोपंतास कळाल्यावर ते आपेगांवी आले व म्हणाले संसार वित्तावाचून चालत नाही व आपली वृत्ती तर उदासीन तेंव्हा आपण आमच्या घरी येऊन रहावे आम्ही ही आता वृध्द झालो आहोत तेव्हा आपण आमचाही संभाळ करावा. देवानेच गा-हाणे ऐकले असे म्हणून विठ्ठलपंत सपत्निक अलंकापुरीत आले. अलंकापुरीत आल्यावर दिवसामागून दिवस जाऊ लागले परंतु त्यांची संसरातील आसक्ती सुटली व विरक्ती वाढली. शिवाय लग्न होऊन बराच काळ गेला तरी अपत्य नाही म्हणून त्यांच्या वृत्तीने संन्यास घेण्याचा ध्यास घेतला व त्यासाठी आपल्या पत्नीची परवानगी असावी म्हणून त्यांनी आपल्या पत्नीस विचारले मी संन्यास घेऊ का?

यावर सिध्दोपंताच्या शिकवणीवरून पितृऋण फेडल्यावर मग तुमच्या मनात येईल तसे करावे असे उत्तर रूक्मिणीबाईनी त्यांना दिले. असा बराच काळ लोटला तरी पुत्रसंतती नाही, असे पाहून विठ्ठलपंत सारावेळ तोच हट्ट घेऊन आपल्या पत्नीजवळ निरोप मागु लागले शेवटी एकदा रूक्मिणीबाईनी उद्वेगाने त्यांना निरोप दिला. हिच पडत्या फळाची आज्ञा म्हणून एका वचनासी विठ्ठलपंत रात्री घराबाहेर पडले व संन्यास दिक्षा घेण्याच्या इच्छेने ते मार्गक्रमण करीत काशी येथे रामानंदाच्या आश्रमात आले व तेथे त्यांनी श्रीपादस्वामींचा उपदेश घेऊन त्यांच्याजवळून संन्यासदिक्षा घेतली. दिक्षा दिल्यानंतर त्यांनी त्यांचे चैतन्य स्वामी असे दुसरे नांव ठेवले. विठ्ठलपंत आश्रमात राहु लागले, इकडे घरून गेल्या दिवसापासून रूक्मिणीबाई व्रत-वैकल्यांचे कडकडीत आचरण करून व नित्य नियमाने इंद्रायणीचे स्नान करून दररोज पिंपळाच्या वृक्षास प्रदक्षिणा घालण्यास सुरूवात केली. कारण [illegible]

## || श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र ||

काही दिवसांनी विठ्ठलपंत म्हणजेच चैतन्यस्वामी यांच्या गुरूस रामेश्वराच्या यात्रेस जाण्याची इच्छा झाली म्हणून आश्रमाची व्यवस्था चैतन्यावर टाकून स्वामी अनेक तीर्थास भेट देत देत आळंदीस आले. तेथे पवित्र इंद्रायणीचे स्नान करून सिध्देश्वराचे दर्शन घेऊन तेथे बसले. नित्यनियमाप्रमाणे रूक्मिणीमाता अश्वसत्यास प्रदक्षिणा घालत होत्या तिचे लक्ष स्वामींकडे गेले. सत्पात्र स्वामी पाहून रूक्मिणीबाईने त्यांना नमस्कार केला तेव्हा स्वामींनी पुत्रवतीभव असा अशिर्वाद दिला हे ऐकून तीला हसू आले हे पाहून स्वामींनी हसण्याचे कारण विचारले? त्यावर रूक्मिणीबाईने सांगितले की माझ्या पतीने काशीला जाऊन संन्यास घेतला आहे. तेंव्हा रूक्मिणींनी खाणाखुणा विचारल्या. त्या सांगताच ओळख पटली तेंव्हा स्वामी रूखमाईस म्हणाले तुम्ही माझे बरोबर चला मी त्यांना तुमच्या स्वाधीन करतो असे म्हणून ते सिध्दोपंतासह काशी येथे स्वामींच्या मठात पोहचले तोच चैतन्य म्हणून त्यांनी हाक मारली व चैतन्यास दरडावून विचारले की तुझ्या घरी कोणकोण आहेत. घरची सर्व मंडळी आलेली पाहून चैतन्यांनी घरची खरी परिस्थिती सांगितली व स्वामींच्या चरणावर मस्तक ठेवले.

हे ऐकून स्वमींनी सांगितले तु आता घरी जा व गृस्थाश्रम स्विकार तु या कर्मांचे मुळीच भय धरू नकोस. त्यास साहय पांडुरंग आहे. नंतर स्वामींचा आशिर्वाद घेऊन सर्व मंडळी आळंदीला परत आली व आळंदीला आल्यावर परत गृहस्थाश्रम स्विकारला. अशी दहा-बारा वर्ष लोटून गेल्यावर विठ्ठलपंतास चार मुले झाली. त्यांची नावे निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई अशी ठेवली. त्यांचा जन्म तीन तीन वर्षाच्या अनुक्रमे शके ११९० शके ११९३ शके ११९६ व शके ११९९ याक्रमाणे झाला. विठ्ठलपत्नीसह चार बालकांना घेऊन गावाबाहेर सिध्दबेटात रहात असत. गावातील लोक त्यांचे दर्शन हा अपशकूनी समजत ही चारही भावंडे मोठी झाली तेव्हा विठ्ठलपंतांना त्यांची मौजीबंधन करावे असे वाटे पण ही गोष्ट काढणार कोणाजवळ? कारण आपणास बहिश्कृत केले आहे. आपण आता त्यांना शरण जाऊ असा विचार करून त्यांनी ब्रम्हसभा भरून हात जोडून विनंती केली ती अशी

मेळविले द्विज केली ब्रम्हसभा | क्षमा अपराध करा दीना ||
सांगाल ते मान्य म्हणती साहीजणे | शुची हे करणे पतितांसी ||
(नामदेव महाराज)

हे ऐकून जन्मलेल्या ब्रम्हवृदांनी त्यांना कठोर असा निर्णय दिला तो असा की तुम्हांला देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरे प्रायश्चित नाही. माझ्या मुलांच्या हिताकरिता देहत्याग करणे आवश्यक तर मी जरूर करीन असे म्हणून विचारांती विठ्ठलपंत व रूक्मिणीबाई या दोघांनी देहांत प्रायश्चित घेतले. त्यानंतर पुन्हा चारही भावंडे ब्रम्हावृदांकडे गेली तरी त्यांचे मौजीबंधन करण्यास कोणी तयार झाले नाही. त्यांनी सांगितले की तुम्ही श्री क्षेत्र पैठण येथे जा व तेथून शुध्दीपत्र आणा ते आम्ही वंद्य मानु. ब्राम्हणांचे हे म्हणणे ऐकून चारही भावंडांस खेद वाटला. तेव्हा आळंदीकरांचे पत्र घेऊन ही भावंडे पैठण क्षेत्री गेली तेथील ब्रम्ह सभेतील श्रेष्ठांसमोर निवृत्तीनाथांनी आणलेले पत्र ठेवले ते वाचून ही संन्याशाची मुले आहेत हे लक्षात आले.

मेळविले द्विज केली ब्रम्हसभा | क्षमा अपराध करा दीना ||

तेंव्हा त्यावर त्यांनी असे सांगितले की, अशा कुळभ्रष्टांना प्रायश्चित नाही. यावर आम्हाला गती काय? असे त्यांनी विचारले त्यावर आपण काहीच उत्तर न देणे कमीपणाचे होईल म्हणून त्यांनी पुढील उपाय सांगितला.

या एक उपाय शास्त्रमते | अनन्यभक्ति तें अनुसरावे ||७||
तीव्र अनुतापे करावे भजन | गो खर आणि श्वान वंदुनिया ||८||
वंदावे अत्यंज ब्रम्हभावनेसी | ऐसे पध्दतीसी बोलियेले ||९ ||
(नामदेव महाराज)

हा त्यांचा उपदेश ऐकून चारही भावंडास परम् संतोष झाला व म्हणाले महाराज आपण जे सांगाल ते आम्हास मान्य आहे. परंतु एवढयावरच हा इतिहास थांबला नाही तर तेथे काही टवाळ लोकांचे लक्ष या चार भावंडांच्या नावाकडे गेले व त्यांची टवाळी करू लागले. तेथे एक पखालवाला आपल्या ग्यान्या नावाच्या रेडयावर पखाल ठेवून त्याच रस्त्यावरून जात होता. त्याकडे पाहून एकाने टवाळी केली आहो! नावात काय आहे. याचे नाव ग्यान्या आहे. त्यावर ज्ञानदेव म्हणाले तुम्ही म्हणता ते खरे आहे. त्याचा व माझा आत्मा एकच आहे. असे म्हटल्याबरोबर एकाने रेडयाच्या पाठीवर चाबकाचे फटके मारले ते ओळ महाराजांच्या पाठीवर उमटले, त्यावर ते म्हणाले ही बंगाली विद्या आहे. हे खरोखरच श्रेष्ठ असतील तर त्यांचेकडून या रेडयाच्या मुखातून वेद बोलवा. त्याक्षणी ज्ञानदेवांनी रेडयाच्या मस्तकावर हात ठेवला व त्याचा परिणाम रेडा वेद बोलू लागला.

ॐ ॥ श्री ज्ञानेश्वरी ॥ ॐ

# ॥ श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र ॥

## ज्ञानदेव म्हणे बोले रे ऋग्वेद | ओंकार शब्द प्रणवाचा ॥

हे पाहून सर्व द्विजवरास पश्चाताप झाला हे ब्रम्हा, विष्णू, महेश या तिन्ही देवांचे अवतार आहेत. व मुक्ताबाई आदिमायेचा अवतार आहे. आपणाकडून मोठी चूक झाली. यांचा वंश व कुळ धन्य आहे. हे पुण्यशील आहेत. असे म्हणून त्यांनी ज्ञानदेवांना नमस्कार करून त्यांचा जयजयकार केला. हा चमत्कार पाहून पैठणच्या ब्राम्हणवृदांना शुध्दीपत्र देताना धन्यता वाटली हे तिन्ही देवांचे अवतार आहेत. यांना प्रायश्चित काय द्यावे?

शुध्दीपत्र हातात पडताच त्यांचा शिष्य ग्यान्या (रेडा) याला घेऊन त्यांनी पैठण सोडले व भक्ति-ज्ञानाचा प्रचार करीत ही सर्व मंडळी मार्गक्रमण करीत गोदावरीपासून दोन-तीन मैलावर प्रवरेच्या काठी असलेल्या म्हाळसापूर (नेवासे) मुक्कामी आले. तेथे शके १२१२ मध्ये ज्ञानदेवांनी लोकप्रिय ज्ञानेश्वरी किंवा ज्ञानदेवी ही श्रीमद्भगवत गीतेवर आपली अलौकिक टीका करून ग्रंथ पुरा केला. या ठिकाणी शुध्द ज्ञानदेवाकडून अलौकिक असा चमत्कार घडला तो म्हणजे मृत अवस्थेत असणारे सच्चिदानंद बाबा यांचे प्रेत जिवंत केले. (म्हणून पुढील आयुष्य सच्चिदानंदबाबाने ज्ञानदेवाच्या सहवासात घालविले.).

श्री ज्ञानदेवांनी याच सच्चिदानंद बाबाच्या हस्ते ज्ञानेश्वरीचे लिखाण करून घेतले. त्याचप्रमाणे अमृतानुभव किंवा अनुभवामृत हा छोटासा ग्रंथ याच ठिकाणी ज्ञानदेवांनी लिहीला या दोन्ही ग्रंथाचे काम पुर्ण झाल्यावर ज्ञानेश्वर महाराजादिक भावंडे तेथून निघाले व पुढे काही अंतरावर पुणतांबे येथे येऊन पोहचले. तेथे गोदावरी तिरी चांगदेव नामक एक महासिध्द समाधी घालून बसला होता व त्याचे भोवती काही प्रेते पडलेली होती. ते पाहून निवृत्ती म्हणाले! ही प्रेते चांगदेवाच्या कृपेने जिवंत होणार आहेत. मुक्ताबाईनि विचारले केव्हा होणार? तेंव्हा निवृत्तीनाथ म्हणाले चांगदेवाची समाधी संपल्यावर हे ऐकुन मुक्ताबाई म्हणाल्या याला एवढा काळ कशाला असे म्हणून काही अंतरावर पडलेले मृत शवाचे (हाड) हाती घेतले व सर्व प्रेता वरून फिरवून फेकून दिले. त्याचबरोबर ते श्वानही जिवंत झाले. व सर्व प्रेतेही जिवंत झाली. असा अलौकिक चमत्कार करून पुढे ही सर्व मंडळी रेड्यासह मार्गक्रमणीत (वणीत) आळे या गावी आले आणि त्या ठिकाणी रेडयास समाधी दिली. तीच आता प्रत्यक्ष आळेगावी रेडयाची समाधी म्हणून प्रसिध्द आहे. पुढे सर्व ही मंडळी आळंदी येथे पोहचली.

पुढे ज्ञानेश्वर महाराजांना तीर्थयात्रा करावी असे वाटले. म्हणून आपले जेष्ठ बंधू व गुरू निवृत्तीनाथ व नामदेवराय इतर भक्त मंडळी बरोबर घेऊन तीर्थयात्रा करण्याकरता निघाले. ते आपली आत्मचर्चा करित व कृष्ण विष्णु गोविंद गात त्यांनी प्रभास, द्वारकादिक (धाम), सप्तपु-या, बाराज्योर्तिलिंग आदि सर्व तीर्थ पाहीली आणि शेवटी पंढपुरला आले. श्री ज्ञानदेवांनी पांडुरंग चरणी मिठी घालून समाधी घेण्याविषयी परवानगी मागितली. ती म्हणजे तुमच्या जवळ समाधी घेईन. तेंव्हा ज्ञानदेवांचे हे वचन ऐकुन भगवंत म्हणाले ज्ञानदेवा! येथे तुम्हांला समाधी घेता येणार नाही तर तुम्हाला पुण्यपावन जी अलंकापुरी येथे समाधी घ्यावी लागेल. ज्ञानेश्वर महाराजांना भगवंताकडुन वचन (आज्ञा) मिळाली ते नामदेवराय यांनी वर्णन केले आहे. या भंगवंताच्या वचनानुसार सर्व संतमंडळी दिंडया पताका घेऊन खिल मनाने खेद करत आळंदीला आली. आळंदीला आल्यवर वद्यपक्षात एकादशीस हरिजागर होऊन द्वादशीस बुधवारी पारणे झाले दुसरे दिवशी म्हणजे गुरूवारी त्रयोदशीस दुपारी गावाजवळील इंद्रायणी नदीच्या काठी श्रीसिध्देश्वराच्या देवळाच्या समोरील नंदी बाजूला सारून समाधीचे स्थान दाखविले. हे पाहुन श्री नामदेवांच्या नारा, विठा गोंदा, महादा यामुलांनी समाधीची जागा झाडून स्वच्छ केली नंतर सर्वानी ज्ञानदेवांची पूजा केली व कंठ दाटून येऊन सर्वांच्या तोंडून एकच उद्गार बाहेर पडले.

## ज्ञानदेव म्हणे बोले रे ऋग्वेद | ओंकार शब्द प्रणवाचा ॥

सर्व भेटल्यानंतर ज्ञानदेवांनी सर्वांना नम्स्कार केला व तुळशी-बेल पत्र अंथरून त्यावर मांडलेल्या दर्भासनावर समाधीस बसले, त्यावेळी निवृत्तीनाथांदी भक्त मंडळीची काय अवस्था झाली असेल हे वर्णन करणे कठिणच आहे.-अशा परिस्थितीतही देवांनी सर्वांना कठीण अंतःकरणाने समाधी स्थानाच्या बाहेर आणले व त्यास शिळा बसविली. संतांनी हरीनामाच्या गजराने व टाळमृदगांच्या आवाजाने दशदिशा दणाणून टाकल्या ही गोष्ट शके १२१८ दुर्मुखनाम संवत्सरी कार्तिक वद्य त्रयोदशीस गुरूवारी घडली. या ज्ञानदेवाच्या समाधी सोहळयानंतर बाकीच्या तिन्ही भावंडांनी अवघ्या आठ महिन्याच्या आतच आपली इहलोकीची यात्रा संपविली संजीवन समाधी घेतली. त्यापैकी श्री सोपानदेव हे सासवड मुक्कामी समाधीस्त झाले.

मुक्ताबाई एदलाबाद जवळ माणगांव येथे सहजस्वरूपी मिळून गेल्या त्या ठिकाणी आपली सर्व भावंडे आपल्या देखत आपल्याला सोडून गेले त्यामुळे निवृत्तीनाथ यांना औदासिन्य उत्पन्न होऊन तेही जेष्ठ वद्य द्वादशीस त्र्यंबकेश्वरी समाधीस्थ झाले. श्री नामदेव महाराजांनी समाधी सोहळयाचे गाथ्यात उत्कृष्ठ वर्णन केलेले आहे. येथे थोडक्यात देण्याचा प्रयत्न केला आहे.

ॐ # ॥ श्री ज्ञानेश्वरी ॥ ॐ





## ॥ श्री ज्ञानेश्वरीची पारायण पध्दती ॥

श्री ज्ञानेश्वरीचे पारायण करण्याच्या पध्दती खालील प्रमाणे दिल्या आहेत. त्या भाविक भक्तांनी आपल्या सोयीनुसार पारायण करणे. श्री ज्ञानेश्वरी वाचतांना ओव्या एका सुरात वाचाव्यात तसेच उच्चार स्पष्ट व सुध्द असावेत. तसेच रोज ग्रंथ पूजन करून शेवटी पसायदान म्हणावे. श्री ज्ञानेश्वरी पारायणा चे शेवटी संपुर्ण श्रीमद्भगवद्गीता व श्री विष्णूसहस्त्र नामासह वाचन करणे आवश्यक आहे.

## ॥ श्री ज्ञानेश्वरी पारायण फलप्राप्ती ॥

श्री ज्ञानेश्वरीचे पारायण करण्या-याचे चित्त शुध्द होऊन परमेश्वराचरणी एकाग्र होते. त्याच्यात सत्संगाची अभिलाषा निर्माण होऊन सदाचरणी बनतो आणि आत्मज्ञान प्राप्तीच्या दिशेकडे वाटचाल करू लागतो.

## ॥ श्री ज्ञानेश्वरी सप्ताह पारायण पध्दती ॥

| दिवस | अध्याय | ओवी संख्या |
|---|---|---|
| पहिला | १ ते ५ | १३२९ |
| दुसरा | ६ ते ९ | १५१३ |
| तिसरा | १० ते १२ | १२९० |
| चौथा | १३ ते १४ | १५८५ |
| पाचवा | १५ ते १७ | १५०५ |
| सहावा | १८ | १३५२ |
| सातवा | १८ | अध्याय पूर्ण |


## ॥ श्री ज्ञानेश्वरी पारायणाची सर्व साधारण पध्दती ॥

१) सात दिवस पारायण असेल तर सरासरी दररोज १३०० ओव्या घेणे

२) तीन दिवस पारायण असेल तर सरासरी दररोज ३००० ओव्या घेणे.

३) पंधरा दिवसाचे पारायण असेल तर सरासरी दररोज ६०० ओव्या घेणे.

४) तीस दिवसाचे पारायण असेल तर सरासरी दररोज ३०० ओव्या घेणे.





# ॐ ॥ श्री गुरूचरित्र ॥ ॐ

.....'श्रीगुरूचरित्र' या ग्रंथाचा नित्यपाठ व पारायणविधी यांविषयी काही महत्वाच्या सूचना.....

## ॐ... नित्यपाठ ...ॐ




१) हा ग्रंथ उपासनेचे साधन म्हणून वाचणाऱ्यांनी तो रेशमी वस्त्रात नीट बांधून शुध्द जागी ठेवावा.

२) हा ग्रंथ अपवित्र स्थानी, गाडीत, प्रवासात वा दुष्टांच्या सहवासात वाचू नये.

३) नित्य स्नान केल्यानंतर शुध्द वस्त्रे नेसून, कपाळास गंध लावून, देवपूजा करून, आसनावर पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख बसून, दत्तात्रेयांना व या ग्रंथाला वंदन करून भक्तिभावाने एक अध्याय वाचावा.

४) ५३ व्या दिवशी ५३ वा अध्याय वाचल्यावर या ग्रंथाचे १ आवर्तन (पारायण) होते. वाचन झाल्यावर दत्तात्रेयांची व नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांची आरती म्हणावी. श्रीगुरूंना महानैवेद्य दाखवावा.

५) ज्यांना नित्य पठण अशक्य नाही त्यांनी 'अवतरणिका' तरी वाचावी.

६) या ग्रंथात प्रत्येक अध्यायाची 'फलश्रुती' दिलेली आहे. अपेक्षित फलप्राप्तीसाठी सहा महिने रोज नियमाने त्या अध्यायाचे संकल्पपूर्वक वाचन करावे. श्रीगुरूंच्या कृपेने कार्यसिध्दी होईल.

७) महत्वाच्या कार्यासाठी बाहेर पडताना गणपतीला व दत्तात्रेयांना नमस्कार करावा. या ग्रंथालाही फूल वाहून वंदन करावे.

## ॐ... पारायण विधी ...ॐ

१) सप्ताह पारायण करताना शुक्रवारी संकल्पपूर्वक आरंभ करावा म्हणजे गुरूवारी समाप्तीचा दिवस येतो.

२) दत्तजयंतीच्या आधी सप्ताह पारायण करावयाचे असेल तर, समाप्ती दत्तजयंतीच्या आदल्या दिवशी करावी. त्यात नृसिंहसरस्वतींच्या श्रीशैल्यपर्वताकडे प्रस्थान केल्याची कथा (अध्याय ५१ व ५२) वाचू नये. दत्तजयंतीच्या दिवशी फक्त दत्तजन्माचा चौथा अध्याय वाचावा.

३) सप्ताह पारायण करताना अनुक्रमे १ ते ९ अध्याय, १० ते २१ अध्याय, २२ ते २९ अध्याय, ३० ते ३५ अध्याय, ३६ ते ३८ अध्याय, ३९ ते ४३ अध्याय व ४४ ते ५३ अध्याय याप्रमाणे प्रतिदिनी वाचन करावे. (टीप - तीन दिवसांचे पारायण करताना अनुक्रमे १ ते २२ अध्याय, २३ ते ३३ अध्याय, व ३४ ते ५३ अध्याय याप्रमाणे प्रतिदिनी वाचन करावे.)

४) सप्ताह काळात नित्य स्नान करून, सोवळे नेसून, कपाळास गंध लावून, घरातील देवांची नित्य पूजा करून घ्यावी. चौरंगावर दत्तात्रेयांची मूर्ती वा तसवीर ठेवून तिची पंचोपचारे पूजा करावी. या ग्रंथाचीही पूजा करावी. मग एकाग्र चित्ताने वाचन करावे.

५) वाचन करताना आसनावर पूर्वाभिमुख बसावे. पहिल्या दिवसापासून एकच जागा ठेवावी. वाचन करताना कोणाशीही संभाषण करू नये, आसनावरून उठू नये, साजूक तुपाचे निरांजन अखंड प्रदीप्त ठेवावे. वाचन पूर्ण झाल्यावर दत्तात्रेयांची व नृसिंहसरस्वती स्वामींची आरती करावी, नैवेद्य दाखवावा. करुणात्रिपदी म्हणावी.

६) पारायण काळात उपवास करावा. दूध, भात, गव्हाची पोळी, तूप, साखर या हविष्यान्नाचे भोजन करावे.

७) ब्रम्हचर्य पाळावे. रात्री चटईवर वा पांढऱ्या धोंगडीवर निजावे.

८) पारायण समाप्तीच्या दिवशी दत्तात्रेयांची उत्तरपूजा करून महानैवेद्य दाखवावा. उद्यापन म्हणून एका ब्राम्हणाला वा किशोरवयीन बटूला भोजन व दक्षिणा द्यावी.

ॐ ॥ श्री गुरूचरित्र ॥ ॐ

## ॥ 'श्री गुरूचरित्र' या ग्रथांची अध्यायानुकमे फलश्रुती ॥

| अध्याय क. | फलश्रुती |
|---|---|
| ०१ | कल्याण होईल. गुरूकृपा होईल. |
| ०२ | सद्गुरूप्राप्ती होईल. गुरूभक्ती दृढ होईल. |
| ०३ | सद्ग्रंथ श्रवणाची गोडी लागेल. संकटात रक्षण होईल. |
| ०४ | विवेक, धैर्यादी सद्गुण वाढतील. दत्तात्रेयांची कृपा होईल. |
| ०५ | अतिथी संतुष्ट होतील. संतती पराकमी होईल. |
| ०६ | कठीण प्रसंगांत योग्य मार्गदर्शन प्राप्त होईल. |
| ०७ | महापातकांचे निरसन होईल. गोकर्ण यात्रेचे पुण्य मिळेल. |
| ०८ | संतती विद्वान होईल. शनिप्रदोष व्रताचे पुण्य मिळेल. |
| ०९ | ऐश्वर्यप्राप्ती होईल. |
| १० | संकटांचे निरसन होऊन कार्यसिध्दी होईल. |
| ११ | संततीविषयी वाटणारी चिंता दूर होईल. |
| १२ | कर्तव्यपूर्तीसाठी केलेले प्रयत्न सफल होतील. |
| १३ | आरोग्यप्राप्ती होईल. पचनकियेच्या तकरारी दूर होतील. |
| १४ | अकस्मात आलेल्या संकटाचे निवारण होईल. रक्षण होईल. |
| १५ | तीर्थक्षेत्रांची यात्रा घडेल. साधनेसाठी एकांत लाभेल. |
| १६ | गुरूसेवेत प्रमाद घडणार नाहीत. गुरूकृपेची प्रचिती येईल. |
| १७ | विद्याभ्यासात प्रगती होईल. फलांमध्ये प्रावीण्य मिळेल. |
| १८ | कर्जमुक्ती लवकर होईल. घरात चोरी होणार नाही. |
| १९ | साधुसंतांची सेवा घडेल. भाग्योदय होईल. |
| २० | संततीवरचे गंडांतर टळेल. संततीचे आरोग्य चांगले राहील. |
| २१ | संततीवरचे गंडांतर टळेल. संततीचे आरोग्य चांगले राहील. |
| २२ | पशुधन सुरक्षित राहील. दुधदुभत्याची कमतरता पडणार नाही. |
| २३ | स्वतःच्या मालकीचे घर होईल. प्रतिष्ठा प्राप्त होईल. |
| २४ | गैरसमज दूर होतील. स्वभावातील दोष जातील. |
| २५ | अंगी विनम्रता बाणेल. वृत्ती निरहंकार होईल. |
| २६ | आपापल्या अभ्यास विषयांत विशेष प्रावीण्य मिळेल. |
| २७ | वादविवादात जय मिळेल. |

| अध्याय क. | फलश्रुती |
|---|---|
| २८ | वृत्ती सन्मार्गरत आणि धर्मानुगामी होईल. |
| २९ | साक्षात्कारी सत्पुरूषाचा सहवास लाभेल. उध्दार होईल. |
| ३० | पतीविषयी वाटणारी चिंता दूर होईल. पतिसहवास लाभेल. |
| ३१ | दांपत्यामधील मतभेद दूर होतील. संसार सुखाचा होईल. |
| ३२ | सौभाग्य अखंड राहील. परदेशस्थ पती सुखरूप परत येईल. |
| ३३ | रूद्राक्ष धारण केल्याचे पुण्य मिळेल. शिवकृपेने मंगल होईल. |
| ३४ | रूद्रपाठाचे पुण्य मिळेल. संतती दीर्घायुषी होईल. |
| ३५ | कठीण कार्यात यश मिळेल. पतीवरील गंडांतर टळेल. |
| ३६ | पतीनिंदेचा दोष जाईल. स्वधर्माचरणाचे महत्त्व पटेल. |
| ३७ | व्यवहारज्ञान वाढेल. गृहस्थाश्रमात सुख लाभेल. |
| ३८ | घरात अन्नधान्याची कमतरता पडणार नाही. |
| ३९ | संतानप्राप्ती होईल. अश्वत्थ सेवेचे पुण्य मिळेल. |
| ४० | गुरूवरील निष्ठा दृढ होईल. शंकरकृपा करील. |
| ४१ | गुरूसेवा घडेल. काशीमहायात्रेचे पुण्य मिळेल. |
| ४२ | गुरूसेवा घडेल. काशीमहायात्रेचे पुण्य मिळेल. |
| ४३ | वैभव प्राप्त होईल. श्रीकृष्णकृपा होईल. |
| ४४ | गुरूतत्त्व आणि शिवतत्त्व एकच आहे याची अनुभूती येईल. |
| ४५ | त्वचाविकार बरे होतील. काव्यप्रतिभा लाभेल. |
| ४६ | द्वैतभावाचे निरसन होईल. |
| ४७ | गुरूंचा, संतांचा व साधुजनांचा सहवास लाभेल. |
| ४८ | धनधान्याची समृध्दी येईल. शेती-व्यवसायात यश मिळेल. |
| ४९ | गाणगापूर यात्रेचे पुण्य मिळेल. श्रीगुरूकृपा करतील. |
| ५० | दुःखद व्याधी ब-या होतील. दुरूस्त गुरूची साक्ष पटेल. |
| ५१ | व्गुरूचा विरह होणार नाही. |
| ५२ | गुरूचा विरह होणार नाही. |
| ५३ | श्रीगुरूचरित्र ग्रंथाच्या पारायणाचे पुण्य मिळेल. |

# || श्री नवनाथ भक्तिसार ||

## ---O ग्रंथवाचन आणि पारायण O---

श्रीनवनाथ भक्तिसार हा ग्रंथ अत्यंत श्रेष्ठ असून परमप्रासादिक आहे व विधिपूर्वक वाचन केले असता साधकाला दिव्य अनुभव देणारा असा आहे. हा ग्रंथ चाळीस अध्यायांचा आहे. याच्या ओव्या ७६०० आहेत. याचा ग्रंथकर्ता धुंडिसुत 'मालुकवि' या नावाचा आहे. तो नरहरी वंशातील असून परमभक्त आहे. त्याचप्रमाणे हा ग्रंथ भक्तिरसाने व अद्भुतरसाने परिपुर्ण भरला आहे. हा ग्रंथ शके १७४१ प्रमाथी नाम संवत्सरात ज्येष्ठ शुध्द प्रतिपदेला लिहून पुर्ण झाला असा उल्लेख ग्रंथात आहे. श्रीमभ्दागवताच्या अकराव्या स्कंधामध्ये नवनारायणाचे संवाद निमि राजाशी झाले आहेत. हे नवनारायण भगवभ्दक्त म्हणून प्रसिध्द आहेत. भगवान द्वारकाधीशांच्या आज्ञेवरून कवी नारायणाने मच्छिंद्र, हरीने गोरक्ष, अंतरिक्षाने जालंधर, प्रबुध्दाने कानिफ, पिप्पलायनाने चर्पट, आविर्होत्राने नागेश, दुमिलाने भरनाथ, चमसाने रेवण व करभाजनाने गहिनी अशी नावे यांनी धारण केली व कलियुगाकत अवतार धारण केले. हा नवनाथांचा संप्रदाय मूळ श्रीदत्तात्रेय गुरूंपासून प्रवृत्त झाला असून आजही हा संप्रदायात दिव्य तेजस्वी लोकांची उज्जवल परंपरा दिसून येते. श्रीनवनाथभक्तिसार या ग्रंथात नवनाथांचे अद्भुत चरित्र वर्णिलेले आहे.

हा ग्रंथ दिव्य चरित्राने नटलेला आहे. या ग्रंथाच्या वाचनाने ऐहिक उत्कर्ष व पारलौकिक कल्याण खात्रीने होते असा भक्तांचा अनुभव आहे. पारायण व सप्ताहपध्दतीचे नियम पुढीलप्रमाणे आहेत.

दिनशुध्दी पाहून ग्रंथारंभ करावा. पूर्वेकडे मुख करून ग्रंथवाचनासाठी आसनावर बसावे. चौरंगावर दत्ताची तसबीर व पोथीक ठेवावी. गणपतीचे स्मरण करून तसेच देवांना व थोर मंडळींना नमस्कार करून ग्रंथाची व दत्तात्रेयांची पूजा करावी. नैवेद्यासाठी पेढे, दूध, खडीसाखर, शक्य असल्यास भरडयाचे वडे असावेत. वाचन पुर्ण होईपर्यंत समई अखंड तेवत ठेवावी. धूप, निरंजन लावावे. शुचिर्भूत असावे. ब्रम्हचर्य पाळावे. अध्याय सुरू झाल्यापासून संपेपर्यंत आसनावरून उठू नये व कोणाशी बोलू नये. सोवळ्याने वाचन करावे. रात्री घोंगडीवर झोपावे. प्रथम दिवशी विडा-सुपारी, नारळ व दक्षिणा ठेवावी. प्रतिदिनी वाचन झाल्यावर दत्ताची आरती करावी. सांगतेसाठी ब्राम्हणास व सुवासिनीस भोजन घालावे. ज्यांना सप्ताह-वाचनास वेळ नसेल त्यांनी श्रावणासारख्या पवित्र महिन्यात संपूर्ण महिनाभर वाचन करावे मात्र अध्याय संपूर्ण वाचावा. काही दिवस दोन अध्याय वाचावेत. वरील सप्ताह व महिन्याचे पारायण घरी वाचले तरी चालेल. परंतु ज्याला लवकर फळ मिळावे अशी इच्छा असेल त्यांनी गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर, माहूर, गिरनार आदी दत्तस्थानांच्या ठिकाणी वाचन करावे. ज्याला समग्र अध्याय वाचण्यास वेळ नसेल त्याने एक तरी ओवी वाचावी व नवनाथांची प्रार्थना करावी म्हणजे मनःकामना पुर्ण होते.

**नवनाथ सांप्रदायिक लोकांची नऊ दिवसांत (नवरात्र) पारायण-वाचन-पध्दती पुढीलप्रमाणे -**

| | | |
|---|---|---|
| दिवस १ ला ६ अध्याय | दिवस ४ था ५ अध्याय | दिवस ७ वा ४ अध्याय |
| दिवस २ रा ५ अध्याय | दिवस ५ वा ५ अध्याय | दिवस ८ वा ३ अध्याय |
| दिवस ३ रा ५ अध्याय | दिवस ६ वा ५ अध्याय | दिवस ९ वा २ अध्याय |

टीप - पारायणाच्या दिवशी प्रसादासाठी विशेषतः भरडयाचे वडे, आंबिल (ताक-जोंधळयाची खीर) व घुग-या (हरभा-याच्या) करतात. वरील माहिती नाथपंथीय लोकांकडून विचारून घेऊन दिली आहे.

## ---O श्रीनवनाथ पूजाविधी O---

नाथपंथी लोकांच्या नित्यचरणात श्रीनवनाथसिध्दांची पूजा अंतर्भूत आहे. ही पूजा दोन प्रकारे केली जाते...
१) दैनिक पूजा २) महापूजा

**१) दैनिक पूजा** - नित्य पूजाअचरणाचा एक भाग म्हणून नाथपंथीजन नवनाथांची नित्य पूजा करतात तिलाच दैनिक पूजा असे म्हणतात. या पूजेत नाथांची व 'नवनाथ भक्तिसार' या ग्रथांची मंत्रपूर्वक यथाविधि पूजा केली जाते. पूजेनंतर 'गोरक्ष जलंदर चर्पटाश्च |' या नवनाथ मंत्राचा व आपल्याला नाथसिध्दाचा १०८ वेळा जप करतात.

**२) महापूजा** - वरूथिनी एकादशी, पौर्णिमा, आमवस्या किंवा गुरूवार या दिवशी नवनाथांची जी विशेष पूजा केली जाते तिला महापूजा असे म्हणतात. या पूजेच्या आरंभी पूजास्थानी गोमूत्र शिंपडून ते पवित्र करतात. मोठया चौरंगा भोवती सुंदर रांगोळी काढून त्यावर वड, पिंपळ व औदुंबर यांच्या फांदया बांधतात. पूजन साहित्यात नऊ वातींची समई, आगरवत्ती, धूप, तूप, वडयाची व विडाची दहा-दहा पाने, सुपा-या, सुगंधी अत्तर व फुले यांचा समावेश असतो. ही पूजा पूजक मिळून करतात. एकटाही पूजा करू शकतो. पूजक शुचिर्भूत होऊन, धूतवस्त्रे नेसून, कपाळावर भस्म लावून पूजेसाठी पाटावर बसतो. चौरंगावर वडाची दहा पाने मध्ये १ व त्याभोवती ९ ठेवतात. पानांवर थोडेसे भस्म व एक सुपारी ठेवतात. यातील मधली सुपारी हे दत्तांचे प्रतीक व अन्य नऊ सुपा-या नवनाथांची प्रतीके असतात. मुख्य पूजेमध्ये मधल्या सुपारीवर (दत्तप्रतीकावर) ताम्हनामध्ये पंचामृत स्नान व अभिषेक करतात. त्या वेळी अघमर्षण सूक्त म्हटले जाते. त्यानंतर प्रत्येक सुपारी ला (नवनाथ प्रतीकरूप) स्नान घालून ती स्वच्छ पुसून पुन्हा जागेवर ठेवतात.

पूजक १० असतील तर प्रत्येकी एक याप्रमाणे १० सुपा-यांना स्नान घालतात. त्यानंतर प्रत्येक पूजक एकेका सुपारीला हात लावून गायत्री मंत्राचा ११ वेळा जप करतो. फुलांची विभागणी करून ती प्रत्येकाकडे दिली जातात. त्यानंतर 'ॐ चैतन्य दत्तात्रेयाय नमः|, ॐ चैतन्य मच्छिंद्राय नमः| ॐ चैतन्य गोरक्षाय नमः|, ॐ चैतन्य जालिंदरनाथाय नमः|, ॐ चैतन्य कानीफनाथाय नमः|, ॐ चैतन्य गहिनीनाथाय नमः|, ॐ चैतन्य रेवणनाथाय नमः|, ॐ चैतन्य चर्पटनाथाय नमः|, ॐ चैतन्य नागनाथाय नमः|, ॐ चैतन्य भर्तरिनाथाय नमः| या नाममंत्रांनी नवनाथांचे स्मरण करतात. मंत्रोच्चार करताना चौरंगावर थोडीथोडी फुले वाहिली जातात. अशी एकवीस आर्वतने झाल्यावर नवनाथ भक्तिसार (गीता व गुरूचरित्र) या ग्रंथातील नवव्या अध्यायाचे वाचन करतात. त्यानंतर सर्वजण गुरूमंत्राचा १०८ वेळा जप करतात. त्यानंतर दत्ताची व नवनाथांची आरती केली जाते खोब-याचा किस, सुंठ, खसखस, पिठीसाखर यांचे एकत्रित मिश्रण प्रसाद म्हणून वाटतात. मुगाची खिचडी, घेवडयाची भाजी, दही आणि वडे या पदार्थांचा नैवेद्य दाखवितात. नैवेद्यानंतर सर्व जण इष्टमित्रांसह आनंदाने भोजन करतात. या पूजेत दक्षिणा ठेवीत नाहीत, हळदकुंकू वाहत नाहीत. सायंकाळी पूजा विसर्जित केल्यानंतर या दहा सुपा-या एका डबीत भरून ती डबी सुयोग्य ठिकाणी ठेवतात.

# ॥ श्री नवनाथ भक्तिसार ॥

## ॥ 'श्री नवनाथ भक्तिसार' या सिध्द आणि फलदायी ग्रंथाच्या प्रत्येक अध्यायाची फलश्रुती ॥





अध्याय ०१ ला : ह्या अध्यायाच्या नित्य पठणाने समंधबाधा निश्चितपणे नाहीशी होते.

अध्याय ०२ रा : ह्या अध्यायाच्या नित्य पठणाने अपार धनप्राप्ती होते व विजय होतो.

अध्याय ०३ रा : ह्या अध्यायाच्या मनःपूर्वक पठणाने शत्रूचा नाश होईल, मुष्टिविद्या प्राप्त होईल, घरात मारूतीचे वास्तव्य राहील.

अध्याय ०४ था : ह्या अध्यायाच्या पठणानामुळे कपटाची बंधनव्यथा सुटेल व शत्रूंचा पराभव होईल.

अध्याय ०५ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने भूतबाधा किंवा पिशाचबांधा होणार नाही.

अध्याय ०६ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने शत्रूच्या मनातले आपल्या विषयीचे कपट नाहीसे होते. शत्रू मित्र होतो.

अध्याय ०७ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने व्यथा जाईल व चिंता दूर होईल. चौ-यांशी लक्ष योनीत जन्म येणार नाही.

अध्याय ०८ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने दूरदेशी गेलेला मित्र परत येईल. चिंता, व्यथा दूर होतील.

अध्याय ०९ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने चौदा विद्या प्राप्त होतील व चौसष्ट प्रकारच्या कला साधतील.





अध्याय १० वा : ह्या अध्यायाच्या पठणाने स्त्रीदोष नाहीसे होतील. कपट जाते व मुलांना दीर्घायुष्य मिळते.

अध्याय ११ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने अग्निपीडा होत नाही. गृहदोष जातात.

अध्याय १२ वा : देवतांचा क्षोभ असेल तर ह्या अध्यायाच्या पठणाने तो जाईल व सर्व देवता अनुग्रह करतील.

अध्याय १३ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने स्त्रीहत्येचा दोष नाहीसा होईल व पूर्वजांचा उध्दार होईल.

अध्याय १४ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने कारागृहातून मुक्तता होईल व समाजात निर्दोषपणे राहता येईल.

अध्याय १५ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने घरातील भांडणे नाहीशी होतील व घरात शांतिसुख मिळेल.

अध्याय १६ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने दुष्ट स्वप्नांचा नाश होईल.

अध्याय १७ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने योग सिध्दी होऊन सन्मार्ग प्राप्त होईल.

अध्याय १८ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने ब्रम्हहत्येचा दोष नाहीसा होईल व कुंभीपाक नरकातून पूर्वजांचा उध्दार होईल.

अध्याय १९ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने परमानंदकारक मोक्ष मिळेल.

अध्याय २० वा : वेड लागले असल्यास ह्या अध्यायाच्या पठणाने ते नाहीसे होऊन प्रापंचिक माणसाचा प्रपंच सुंदर होईल.

# || श्री नवनाथ भक्तिसार ||

## || 'श्री नवनाथ भक्तिसार' या सिध्द आणि फलदायी ग्रंथाच्या प्रत्येक अध्यायाची फलश्रुती ||





अध्याय २१ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने गोहत्येचे पातक नाहीसे होऊन तपोलोकात जाता येईल.

अध्याय २२ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने विद्यासंपन्न मुलगा होईल व तो विद्वानांना मान्य होईल.

अध्याय २३ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने घरामध्ये अखंडपणे सोने शिल्लक राहते.

अध्याय २४वा : ह्या अध्यायाच्या पठणाने बालहत्या दोष नाहीसे होऊन मुले सखी होतात.

अध्याय २५ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने शाप बाधणार नाही, मनुष्यजन्म येईल आणि सुंदर स्त्री व पुत्र मिळेल.

अध्याय २६ वा : या अध्यायाच्या पठणाने गोहत्येचे दोष जाऊन शत्रुतुल्य मुले होणार नाहीत.

अध्याय २७ वा : हरवलेली वस्तू व पूर्वीचा नाहीसा झालेला अधिकार या गोष्टी ह्या अध्यायाच्या पठणाने परत मिळतात.

अध्याय २८ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने गुणवान स्त्रीशी लग्न होईल व ती स्त्री अखंड सेवा करील.

अध्याय २९ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने क्षयरोग बरा होईल व तीन प्रकारचे ताप जातील.

अध्याय ३० वा : ह्या अध्यायाच्या पठणाने चोराची दृष्टी नाहीशी होईल.





अध्याय ३१ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने शाबरीमंत्राचे कपटी प्रयोग आपणावर होणार नाहीत.

अध्याय ३२ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने गंडांतर नाहीसे होईल व आयुष्य वाढेल.

अध्याय ३३ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने धनुर्वात होणार नाही व झाला असेल तर बरा होईल.

अध्याय ३४ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने सर्व कार्यसिध्दी होऊन यश मिळले.

अध्याय ३५ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने महासिध्दी मिळतील व बेचाळीस पुरूषांचा उध्दार होईल.

अध्याय ३६ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने साप व विंचू यांचे विष उतरून मनुष्य बरा होईल.

अध्याय ३७ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने दुःशीलपणा नाहीसा होऊन विद्या प्राप्त होईल.

अध्याय ३८ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने हिवताप, नवज्वर व इतर ताप नाहीसे होतील.

अध्याय ३९ वा : ह्या अध्यायाच्या पठणाने युध्दात विजयप्राप्ती होईल.

अध्याय ४० वा : ह्या अध्याय परिसाप्रमाणे व कामधेनूप्रमाणे सर्व इच्छा पुर्ण करील.

|| संपुर्ण श्रीनवनाथभक्तिसार वाचल्याने पुण्य मिळेल. पुत्र, पौत्र, यश, धन, धान्य इत्यादी गोष्टी प्राप्त होतील. ||

# ॐ ॥ श्री सिध्दबेटाचा इतिहास ॥ ॐ

**आळंदी हे गांव पुण्यभूमी ठाव | दैवताचे नांव सिध्देश्वर ॥१॥**
**चौ-यांशी सिध्दांचा सिध्दबेटी मेळा | तो सुख सोहळा काय वर्णू ॥२॥**
**कैलासीचा वास अधिक सिध्दबेट | विष्णूंचे वैकुंठ पुरातन ॥**

या प्रमाणे नामदेव महाराजांनी अपूर्व वर्णन केले आहे. त्रिलोकीतील सकल तीर्थ देवतांसह. पूज्य चारधाम सातपु-या, बारा ज्योतिर्लिंग, योगी, संत यांच्या सिध्दबेट अजानवृक्ष परिसरात श्री ज्ञानेश्वर महाराजादी पूजनाच्या निमित्ताने भिन्न रूपे धारण करून वास्तव्य करत आहेत. ज्ञानेश्वर महाराजांचे वास्तव्य असलेल्या सिध्दबेटात सांप्रदायिक साधना करण्यासाठी, पवित्र भूमीचे दर्शन घेण्यासाठी भाविक मंडळी आवर्जुन येथे येतात. नामदेवांसह ज्ञानेश्वर महाराज तीर्थाटन करून आल्यानंतर याच सिध्दबेटात राहिले.

इ.स.१२९३ मध्ये सर्व संतमेळी ज्ञानेश्वर महाराजंनी संजीवन समाधी घेतल्यानंतर महाराजंची समाधी बराच काल गुप्त स्वरूपात होती. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे इ.स. १६४७ मध्ये स्वधनातुन समाधी मंदिर बांधले. (पुणे गॅजेट १८८५ पान नं.१०२ ते १०४) श्री संत तुकाराम महाराजांनी ३५० वर्षे बंद पडलेला माऊलींचा पालखी सोहळा सुरू केला.



सिद्धबेट येथूनच श्री ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या योग सामर्थ्याने आपल्या भावंडासमवेत निर्जिव भिंत आकाशात मार्गाने चालविली व चांगदेवाला सामोरे गेले. (श्री. चांगदेव व श्री. ज्ञानदेव यांची भेट)

**अंतकाळी विठी आम्हांस पावला | कुडी सहीत झाला गुप्त तुका ॥**

फाल्गुन वद्य २ ला देहूस सप्ताही काल्याचे किर्तनांती देहु येथे जगतगुरू श्री तुकाराम महाराज सदेही वैकुंठास गेले त्यांचे पुत्र श्री नारायण महाराजांनी इ.स.१७०० मध्ये सिध्देबेटात त्यांच्या बांधलेल्या मंदिराची प्रतिकात्मक जागा आहे. त्यानंतर हि पालखीची परंपरा तुकाराम महाराजांचे चिरंजीव श्री संत नारायण महाराजांनी तुकाराम महाराज व ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुका एकाच पालखीत ठेवून याच सिध्दबेटातून पंढरीवारीस नेत असत. नंतर माऊलींचे निस्सिम भक्त श्री हैबतबाबांनी माऊलींचा स्वतंत्र पालखी सोहळा नेण्याचा प्रारंभ केला तो पालखी सोहळा लाखोंच्या संख्येने आज तागायत चालू आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे आई-वडील श्री विठ्ठलपंत व रुक्मिणीमाता यांनी वेदोक्त मंत्रोच्चार करून इ.स.१२८६ मध्ये प्रयाग या क्षेत्री देहांत प्रायश्चित घेतले. इ.स.१२८७ मध्ये शुध्दीपत्राच्या निमित्ताने श्री ज्ञानेश्वर महाराज आपल्या भावंडांसह श्री क्षेत्र पैठण येथे आले. रेडयाकरवी वेद वदविले. स्वर्गस्थ पितरांना जेवू घातले.

नेवासी येथील प्रेत स्वरूपात असलेल्या सच्चिदानंद बाबास जिवंत करून त्याचेकरवी "ज्ञानेश्वरी" हा ग्रंथ लिहिला. नेवाश्यातून पुन्हा सिध्दबेट या ठिकाणी वास्तव्यास आले. योगी श्री चांगदेव महाराज यांचे गर्वाहरण व्हावे म्हणून सिध्दबेट येथून भैरवनाथ मंदिरांपर्यत निर्जीव भिंत चालवली. (सोलापूर गॅजेट पान नं. ८३० ते ९४६) हि अलौकिकता पाहून चांगदेव महाराज शरण आले. ज्ञानेश्वर महाराजादी संतांचे पूजन करून सोहळयास जमलेल्या भाविकांना सामुदायिक मिष्ठान्नांचे भोजन दिले.

सिध्दबेट हे अतिप्राचीन स्थळ आहे. यामध्ये अजान वृक्षांसह अनेक झाडे आहेत. येथे चौ-यांशी नवनाथी सिध्दपुरूषांच्या समाध्या असल्यामुळे याला "चौ-यांशी सिध्दांचा सिध्दबेटी मेळा" असे संबोधले जाते. सिध्द बेट परिसरामध्ये ज्ञानेश्वर माऊलींचे वडील - विठ्ठलपंत व आई रुक्मीणी या दोघांचे एक जुने देऊळ योगी श्री चांगदेव महाराजंनी येथे बांधलेले आहे. सिध्दबेट परिसरात आंबा, वड, पिंपळ, करंज, कदंब वगैरे गगनचुंबी नादरूकादि निसर्गरम्य विशाल झाडे आहेत.

# ॐ ॥ श्री सिध्दबेटाचा इतिहास ॥ ॐ

इ.स.१२५६ पासुन असलेली श्री माऊलींच्या आई-वडीलांची कोपीची जागा आहे. याच सिध्द बेटात श्री संत निवृत्तीनाथ महाराज, श्री संत ज्ञानेश्वर महाराज श्री संत सोपानकाका महाराज व श्री संत मुक्ताबाई महाराज यांच्या जन्मस्थानाचे मंदिरांची प्रतिकात्मक जागा असुन या ठिकाणी इ.स.१२६८ पासून हे प्राचीन मंदिर व ओटा येथे आहे. इ.स.१२९० पर्यत माऊलीच्या चारी भावडांचे कीडास्थाने, वास्तव्य भूमी व कर्मभूमी असलेले हे पवित्र स्थान आहे. या सिध्दबेटात वैदिक, वारकरी, वैष्णव संतांची सामुदायिक गिर्दी भागवत, रामायणादि पारायणे करून पावन झालेली ही रम्य व पवित्र जागा आहे.

येथे सर्व वारकरी मंडळी रंजले-गांजलेले, दीन-दुबळे भाविक भक्त, नाथपंथी, कबीरपंथी, बैरागी, संन्यासी, योगी आदि मंडळी अनादी कालापासुन येतात असे स्कंधपुराण, शिवपुराण, आळंदी महात्म्य, ज्ञानेश्वरांच्या समाधीचे अभंग यात यांचे वर्णन आलेले आहे. असे नामदेवादि संतांचे सिध्द बेटाचे महात्म्य वर्णन करणारे हजारो अभंग आहेत.




आळंदी हे गांव पुण्यभूमी ठांव | दैवताचे नांव सिध्देश्वर ॥१॥
चौ-यांशी सिध्दांचा सिध्दबेटी मेळा | तो सुख सोहळा काय वर्णू ॥२॥
विमानांची दाटी पुष्पांचा वर्षाव | स्वर्गाहूनी देव करिताती ॥३॥
नामा म्हणे देव चला तया ठाया | विश्रांती घ्यावया कल्पवरी ॥४॥

कैलासीचा वास अधिक सिध्दबेट | विष्णूंचे वैकुंठ पुरातन |
भूमीवर हे साक्षात वैकुंठ | पूर्वी येथे होते निलकंठ |
ब्रम्हादिकी वरिष्ठ | तप येथेची पै केले ॥१॥
भोवती वनवल्ली वृक्षी | देव होऊनी येती पक्षी |
हे असो नित्य साक्षी | अस्ती नासती उदकी ॥२॥
कोटी कुळे अमुप उध्दारीन |
अजान वृक्षाची पाने जाण | भक्षुन करी जो अनुष्ठान |
त्यासी साध्य होईल ज्ञान | येथे संशय नाही |
भोवती वनवृक्षवल्ली पंचकोशी खडे | झाले धडपुडे ब्रम्हरूप ॥

याच सिध्दबेटी मुक्ताबाईनी माऊलींच्या पाठीवर योगसामर्थ्यानि मांडे भाजले.

मुक्ताईने बोध खेचराशी केला | तेणे नामयाला उपदेशिले ॥
नामयाचे कुटूंब चांगावटेश्वर | एका जनार्दनी विस्तार मुक्ताईचा ॥

विसोबा नावाच्या ब्राम्हणाला बोध केला, वेदविद्या पारंगत अशा ब्रम्हणाला ब्रम्हज्ञान व अनुभूती मुक्ताबाइने याच ठिकाणी दिली तदनंतर आपण वेदांच्या ज्ञानाचे ओझे वाहणारे खेचरच होतो असे पटल्याने त्यांनी स्वतःला विसोबा खेचर म्हणविले तसेच मुक्ताईने ताटीच्या अभंगाने ज्ञानेश्वरीला शांतविले असे हे ऐतिहासिक, पौराणिक महान किर्तीचे अलौकीक सिध्दबेट आहे.